सत्यमेव जयते

महाराष्ट्र पोलीस

सद्रक्षणाय खलनिग्रहणाय

# पोलीस अधीक्षक कार्यालय, सातारा.

९३, मल्हार पेठ, सातारा.

दुरध्वनी क्रमांक ०२१६२-२३२२२५

ई-मेल आय डी- sp.satara@mahapolice.gov.in

जा.क्र/जिवानिशा/वाहतुक अधिसुचना/३६२/२०२५ पोलीस अधीक्षक कार्यालय सातारा दिनांक - ०५/१२/२०२५

## अधिसुचना

पुसेगाव पोलीस ठाणे हद्दीत पुसेगाव शहरामधुन जाणाऱ्या सातारा ते पंढरपुर या राज्य महामार्गाचे रुंदीकरण व रस्ता कॉक्रीटकरणाचे काम पुसेगाव शहरात सेवागिरी मंदिर पुल ते बाचल कॉर्नर असे सुरु असुन दैनंदिन रस्ता वाहतुकीवर त्याचा परिणाम होवु नये या करीता जा.क्र/जिवानिशा/वाहतुक अधिसुचना/३४५/२०२५ पोलीस अधीक्षक कार्यालय सातारा दिनांक - १९/११/२०२५ अन्वये दि. २०/११/२०२५ ते ०५/१२/२०२५ पर्यत वाहतुक मार्गात बदल करणेत आला होता परंतु अद्यापपर्यत राज्य महामार्गाचे काम पुर्ण झाले नसल्यामुळे सदर राज्य महामार्गाचे रुंदीकरण व कॉक्रीटकरणाचे काम पुर्ण होईपर्यत व वाहतूक सुरळीत राहणेकरीता सदर मार्गावरील वाहतुक ही पर्यायी मार्गाने वळविणे बाबतची अधिसुचना प्रसिद्ध करणेत येत आहे.

मी तुषार दोशी भापोसे, पोलीस अधीक्षक सातारा, मला महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ चे कलम ३४ अन्वये प्राप्त असलेल्या अधिकारान्वये पुसेगाव शहरामधुन जाणाऱ्या सातारा ते पंढरपुर या राज्य महामार्गावरील वाहतूक मार्गात बदल करुन वाहतूक व्यवस्था सुरळीत राहणेकरीता दि. ०६/१२/२०२५ चे ००.०१ पासुन दि. १२/१२/२०२५ चे २३.५९ वा. पर्यत खालील अधिसुचना पारित करीत आहे.

## वाहतुक मार्गातील बदलाबाबत

## वाहतुक मार्गातील बदल खालीलप्रमाणे करण्यात आला आहे.

१. सातारा बाजुकडुन दहिवडी बाजुकडे जाणारी सर्व प्रकारची वाहतुक ही नेर फाटा - नेर गाव - ललगुन - बुध - राजापुर - कुळकजाई - मलवडी मार्गे दहिवडी कडे जाईल. **किंवा** नेर फाटा - नेर गाव - ललगुन - बुध - शिवाजी चौक पुसेगाव मार्गे दहिवडी कडे जाईल.

२. दहिवडी बाजुकडुन सातारा बाजुकडे जाणारी सर्व प्रकारची वाहतुक ही शिवाजी चौक पुसेगाव येथुन खातगुण फाटा - खातगुण गाव - जाखणगाव - विसापुर - विसापुर फाटा (औंध फाटा) येथुन सातारा कडे जाईल. **किंवा** पिंगळी येथुन वडुज - चौकीचा आंबा - विसापुर - विसापुर फाटा (औंध फाटा) येथुन सातारा कडे जाईल.

३. वडुज बाजुकडुन सातारा बाजुकडे जाणारी सर्व प्रकारची वाहतुक ही खटाव येथुन जाखणगाव - विसापुर - विसापुर फाटा (औंध फाटा) मार्गे सातारा कडे जाईल.

Scanned with CamScanner

४. फलटण वरुन सातारा बाजुकडे जाणारी सर्व प्रकारची वाहतुक ही ललगुन येथुन नेर गाव - नेर फाटा मार्गे साताराकडे जाईल.

५. पुसेगाव मधील सेवागिरी मंदिर पुल ते बाचल कॉर्नर पर्यतचा मार्ग वाहतुकीसाठी बंद करणेत आला आहे.

तरी वरील वाहतूक ज्या ज्या ठिकाणावरुन वळविण्यात आली आहे. त्या ठिकाणी पोलीस बंदोबस्त नेमण्यात आला आहे. वरील वाहतूक मार्गात केलेल्या बदलांसाठी सर्व भाविकांनी/नागरीकांनी व वाहन चालकांनी नोंद घेवून पोलीस दलास सहकार्य करावे.

सदरची अधिसुचना माझ्या स्वाक्षरी व शिक्यानिशी दिनांक ०५/१२/२०२५ रोजी जारी करण्यात आली आहे.

SUPDT. OF POLICE SATARA

(तुषार दोशी) भापोसे
**पोलीस अधीक्षक सातारा**

ठिकाण - सातारा
दिनांक - ०५/१२/२०२५
प्रति,

१) मुद्रण व्यवस्थापक, कारागृह मुद्रणालय, पुणे
२/- महाराष्ट्र राजपत्रकामध्ये आदेश प्रसिध्द करुन प्रति रेकॉर्डकरता पाठविणेबाबत.

२) जिल्हा माहीती अधिकारी, सातारा यांना वृत्तपत्रात प्रसिध्दी करण्यासाठी.

३) संपादक/प्रतिनिधी, दैनिक ऐक्य, पुढारी, लोकसत्ता,लोकमत, तरुण भारत, सकाळ, सामना, ग्रामोध्दार, पुण्यनगरी, महाराष्ट्र टाईम्स, तिरंगा, मुक्तागीरी, जिव्हाळा यांना वृत्तपत्रात प्रसिध्द करणेसाठी

४) पोलीस अधीक्षक, सोलापूर ग्रामीण, सांगली, पुणे ग्रामीण
२/- सदर आदेशाची प्रसिध्दी आपल्या कार्यक्षेत्रातील स्थानिक वृत्तपत्रामध्ये करणेस विनंती.

५) सर्व उपविभागीय पोलीस अधिकारी, सातारा जिल्हा.

६) सर्व पोलीस ठाणे प्रभारी अधिकारी सातारा जिल्हा.

प्रत माहीतीसाठी सादर

८) मा.विशेष पोलीस महानिरीक्षक कोल्हापुर परिक्षेत्र कोल्हापुर.

९) मा.जिल्हाधिकारी सातारा.

१०) पोलीस अधीक्षक,महामार्ग परिक्षेत्र पुणे.

Scanned with CamScanner